आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ फेब्रुवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्यात उद्या मुंबईत चर्चा

- एआय इम्पॅक्ट समिटला आजपासून नवी दिल्लीत सुरुवात

- अजित पवार यांच्या निधनानंतरच्या दुखवट्याच्या काळात ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या निर्णयाला मुख्यमंत्र्याकडून स्थगिती

- राजस्थानात कारखान्याला लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू

**आणि**

- सीबीएसईची दहावी आणि बारावीची परीक्षा उद्यापासून, पहिली परीक्षा देणाऱ्यांनाच दहावीची दुसरी परीक्षा देता येणार

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मुंबईत येणार आहेत. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ आजपासून ३ दिवस भारत दौऱ्यावर येत असून दोन्ही नेत्यांची उद्या मुंबईत लोकभवन इथं भेट होणार आहे. उभय देशातल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा ते यावेळी घेतील. त्यानंतर ते भारत फ्रान्स नवेन्मेष वर्ष २०२६ या कार्यक्रमाचं उद्घाटन संयुक्तपणे करतील. दोन्ही देशातले मोठे व्यावसायिक, उद्योगपती, संशोधक, आणि नवोन्मेषकर्मी या कार्यक्रमात भाग घेणार आहेत. मॅक्राँ यांची ही चौथी भारत भेट असून मुंबईला ते प्रथमच भेट देणार आहेत.

<><><><><>

एआय इम्पॅक्ट समिट २०२६चं औपचारिक उद्घाटन आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे. त्यापूर्वी त्यांनी भारत मंडपम इथं विविध कंपन्या आणि संस्थांनी उभारलेल्या स्टॉलची पाहणी केली आणि त्यांचं तंत्रज्ञान जाणून घेतलं. या परिषदेत सहभागी होण्यासाठी शंभर पेक्षा जास्त देशांना आमंत्रित करण्यात आलं आहे. २० पेक्षा जास्त देशांचे नेते आणि ४५ पेक्षा जास्त देशांची मंत्रिस्तरीय शिष्टमंडळं परिषदेत सहभागी होणार आहेत. दोन लाखांपेक्षा जास्त लोकांनी यासाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. या परिषदेविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ फेब्रुवारी २०२६ - सोमवार

- **- होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(भारताच्या वेगानं विस्तारणाऱ्या क्रिएटर अर्थव्यवस्थेला देशाच्या मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा आणि कुशल लोकसंख्येमुळे बळकटी मिळत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केलं. कृषी, हवामानाचे अंदाज, उत्पादकता या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा परिणाम व्यापक असल्याचं ते यावेळी म्हणाले. या तंत्रज्ञानाचे संभाव्य तोटे कमी करून त्याचा जास्तीत जास्त फायदा करून घेण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं वैष्णव म्हणाले.*

*या परिषदेत पाच नाविन्यपूर्ण स्टार्टअपसह भारतातल्या वेगाने वाढणाऱ्या एआय आणि गेमिंग परिसंस्थेशी संबंधित चर्चा आणि प्रदर्शनांचा समावेश आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने आज या परिषदेत आज सार्वजनिक आरोग्यासाठी एआय या विषयावर चर्चा आयोजित केली होती. मिशन कर्मयोगीवरचा एक स्टॉलही यात आहे.)*

**<><><><><>**

देशात न्यायालयाप्रमाणेच काम करणाऱ्या quasi judicial अर्थात न्यायिकवत संस्थांच्या कार्यप्रणालीत सुधारणांप्रकरणी सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. न्यायधिकरण आणि तत्सम न्यायिकवत संस्थांमधे अनेक पदं रिक्त आहेत. तसंच त्यांचे अधिकार आणि स्वातंत्र्य याबाबत स्पष्टता आवश्यक आहे, असं यासंदर्भात दाखल झालेल्या याचिकेत म्हटलं आहे.

**<><><><><>**

गोव्याच्या आरपोरा नाईटक्लब आग प्रकरणातल्या पीडितांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी गोवा सरकारची असल्याचा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा पीठानं दिला आहे. या दुर्घटनेत कामगारांच्या मूलभूत हक्कांचं हनन झाल्याचं न्यायमूर्ती सुमन श्याम आणि न्यायमूर्ती अमित जामसंडेकर यांच्या खंडपीठानं म्हटलं आहे. गेल्या डिसेंबरमधे आरपोरातल्या बर्च बाय रोमियो लेन या नाईटक्लबमधे आग लागून २५ जणांचा मृत्यू झाला. त्यासंदर्भात दाखल जनहित याचिकेवर आज उच्च न्यायालयानं हा निर्णय दिला.

**<><><><><>**

भारत आणि पोर्तुगीज सरकारमध्ये झालेल्या प्रत्यार्पण करारानुसार मुदतपूर्व सुटका मिळावी यासाठी कुख्यात दहशतवादी अबु सालेम याने दाखल केलेला अर्ज आज सर्वोच्च

न्यायालयानं फेटाळून लावला. पोर्तुगीज सरकारबरोबर झालेल्या प्रत्यार्पण करारात २५ वर्षांचा तुरुंगवास पूर्ण झाल्यानंतर सालेम याची सुटका करावी लागेल, असं नमूद होतं. सालेम गेली २५ वर्षं कोठडीत असल्याचा युक्तिवाद त्याच्या वकिलांनी केला. मात्र, सालेम याच्या कोठडीची २५ वर्षं पूर्ण झालेली नाहीत, असा युक्तिवाद सरकारनं न्यायालयात केला. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या पीठाने सालेमचा मुदतपूर्व सुटकेचा अर्ज फेटाळला, मात्र त्याला उच्च न्यायालयात दाद मागता येईल असं स्पष्ट केलं.

<><><><><>

गेल्या महिन्यात ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा बहाल करणाच्या निर्णयाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्थगिती दिली आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी उच्चस्तरिय अधिकाऱ्याकडून करुन दोषींवर कारवाई करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात २८ ते ३० जानेवारी या कालावधीत शासकीय दुखवटा जाहीर केला होता. याच काळात ७५ शाळांना भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्याक दर्जा देणारी प्रमाणपत्रे जारी झाली होती.

<><><><><>

राजस्थानमध्ये भिवाडी इथल्या एका औद्योगिक वसाहतीतल्या कारखान्यात आज सकाळी लागलेल्या आगीत ८ कामगारांचा मृत्यू झाला, तर काही कामगार आत अडकले असल्याची शक्यता आहे. कारखान्यात स्फोट झाल्यामुळे आग लागल्याचं स्थानिक सूत्रांनी सांगितलं. या ठिकाणी मदत कार्य अद्याप सुरु आहे. या दुर्घटनेबद्दल उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

सीबीएसई, अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १० वी आणि १२ वीच्या परीक्षा उद्यापासून सुरु होत आहेत. भारतातले आणि परदेशातले ४६ लाखापेक्षा जास्त विद्यार्थी ही परीक्षा देत आहेत. या परीक्षेचे पेपर फुटल्याच्या अफवांना विद्यार्थ्यांनी आणि इतरांनी बळी पडू नये, असं आवाहन परीक्षा मंडळानं केलं आहे. सीबीएसई दहावीच्या परीक्षा १० मार्च रोजी, तर बारावीच्या परीक्षा ९ एप्रिल रोजी संपतील. दहावीच्या विद्यार्थ्यांना यंदा गुण सुधारण्यासाठी दुसऱ्यांदा परीक्षा देता येईल. त्याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - - होल्ड व्हाइस कास्ट सीबीएसई- - -**

*(सीबीएसई यंदाच्या वर्षांपासून इयत्ता १० वी साठी परीक्षा दोन वेळा घेणार आहे. विद्यार्थ्यांना यातल्या पहिल्या परीक्षेच्या किमान ३ विषयांचे पेपर द्यावे लागतील. एखाद्या विद्यार्थ्याने पहिल्या परीक्षेत किमान तीन किंवा त्यापेक्षा जास्त विषयांची परीक्षा दिली नसेल, तर त्याला दुसऱ्या परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. पहिल्या परीक्षेला जे विद्यार्थी बसू शकणार नाहीत, त्यांना दुसऱ्या परीक्षेला बसण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती अनेक पालकांनी दाखल केली होती. त्यावर मंडळानं हे स्पष्टीकरण दिलं आहे. सर्व उत्तीर्ण आणि पात्र विद्यार्थ्यांना दुसऱ्या परीक्षेच्या माध्यमातून विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा या तीन विषयांपैकी कोणत्याही विषयात कामगिरी सुधारण्याची परवानगी असेल, असं सीबीएसईचे परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांनी म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

नोकरीसाठी जमीन प्रकरणी माजी रेल्वेमंत्री लालूप्रसाद यादव आणि त्यांच्या पत्नी राबडी देवी यांच्याविरूद्ध दिल्लीतल्या एका न्यायालयात आज आरोप निश्चित करण्यात आले. याप्रकरणी आपण दोषी नसल्याचं सांगत लालूप्रसाद आणि राबडी देवी यांनी खटला लढवण्याची तयारी दाखवली आहे. याप्रकरणी पुढची सुनावणी येत्या २७ तारखेला होणार आहे.

**<><><><><>**

चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या घरावर गोळीबार केल्या प्रकरणी सात जणांना आज विशेष न्यायालयाने २५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. १ फेब्रुवारी रोजी हा गोळीबार झाला होता. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या पथकाने काल रात्री हरयाणा आणि राजस्थानमधून सात जणांना अटक केली. यात मुख्य आरोपी दीपक शर्मा याचाही समावेश आहे. या अटकेमुळे एकूण अटक झालेल्या आरोपींची संख्या ११ झाली आहे. मात्र, या प्रकरणातला मुख्य आरोपी असलेला शुभम लोणकर हा लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सदस्य अद्याप फरार आहे. या सर्व आरोपींविरुद्ध मकोका कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात डिसेंबरपर्यंत देशाच्या आयात केलेल्या चांदीच्या मूल्यात १२८ टक्के वाढ झाली. वाणिज्य मंत्रालयानं दिलेल्या आकडेवारी नुसार गेल्या आर्थिक वर्षात या

कालावधीत ३ अब्ज ३९ कोटी अमेरिकन डॉलर चांदीची आयात झाली होती. यंदा हे प्रमाण ७ अब्ज ७७ कोटी अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचलं. या कालावधीत आयात केलेल्या सोन्याच्या मूल्यात सुमारे २ टक्क्यांची वाढ झाली.

<><><><><>

भारतीय अधिकाऱ्यांचं एक पथक पुढच्या आठवड्यात अमेरिकेला जाऊन भारत अमेरिका व्यापार कराराच्या मजकुराला अंतिम स्वरुप देईल, अशी माहिती वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज दिली. हा दौरा येत्या २३ तारखेपासून सुरू होणार आहे. भारत आणि अमेरिकेने दिलेल्या संयुक्त निवेदनात व्यापार करारासाठीची चौकट अंतिम करण्यात आली होती. यात कराराचे आराखडे मांडले होते, त्या आराखड्यांना कायदेशीर करारात रुपांतरित केल्यानंतर दोन्ही बाजूंनी स्वाक्षऱ्या करण्यात येतील, असं अग्रवाल म्हणाले.

<><><><><>

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत ब गटात ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांचा सामना सुरू आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या १४ षटकात ४ बाद १३६ धावा झाल्या होत्या.

ड गटात दिल्लीत झालेल्या सामन्यात अफगाणिस्ताननं संयुक्त अरब अमिरातनं ५ गडी राखून विजय मिळवला. संयुक्त अरब अमिरातनं प्रथम फलंदाजी करताना निर्धार २० षटकात ९ गडी गमावून १६० धावा केल्या. अफगाणिस्ताननं ही धावसंख्या पाच गड्यांच्या मोबदल्यात सामन्याचे चार चेंडू बाकी असताना पार केली.

क गटात कोलकाता इथं झालेल्या सामन्यात इंग्लंडनं इटलीवर २४ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं सात गडी गमावून २०२ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना इटलीचा डाव १७८ धावात आटोपला.

//<><><><><>//